रे. दि. मु. ४५/२०१८ मधील नि २४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहीता आदेशिका ३९ नियम १ अन्वये दाखल करणेत आलेला आहे.

२. वादीची बाजु थोडक्यात अशी आहे की, वाडीवरवडे गाव येथील श्री देवी भद्रकाळी पंचायतनाचे देवी भराडीचे पुरातन मंदिर आहे. सदर देवाचा मलमान काढण्याचा, देवस्थानाचे उत्पन्न भोगण्याचा अधिकार वादी कुळ घराण्याचा वैयक्तीक अधिकार आहे. सदर देवस्थान -तील इस्लाह म्हणजे देवतांच्या वस्तु या वादी कुळघराण्याच्या ताब्यात आहेत. सबब वादी हे देवी भद्रकाली भराडी पंचायतन या देवस्थानाचे प्रमुख मानकरी आहेत. फाल्गुन शुध्द होळी पौर्णिमे दिवशी सकाळच्या देवळाकडे नेयात एक होळी व संध्याकाळी चव्हाट्यावर एक होळी अशा दोन होळ्या घालणे, होळ्या उभ्या करणे इत्यादी त्या सणाच्या अनुषंगिक सर्व कामे म्हणजे हाकदवणी घालणे, वगैरे सर्व देव कार्य करण्याचा अधिकार हा वादी कुटुंबाचा/घराण्याचा वैयक्तीक अधिकार हक्क आहे.

३. वादी क्र. १ ते ३ यांचे वडील यांनी याच न्यायालयामध्ये केशव गोपु घुरे वगैरे ८० यांचे विरुध्द श्री देवी भद्रकाली भराडी पंचायतन या देवस्थानामध्ये देवकार्य करण्याचा, मलमान, उत्पन्न वगैरे भोगण्याचा हक्क वादी घराण्याचा वैयक्तिक हक्क आहे असे ठरवुन मिळण्यासाठी रे.दि.मु. ५१/६० हा दावा दाखल केला होता. त्या दाव्याचा निकाल वादी तर्फे लागुन त्यांच्या अधिकाराची हक्कस्थापना करणेत आली व त्या कामातील प्रतिवादी यांना तद् अनुषंगिक मनाई देखील देण्यात आली. सदर दाव्यातील निकाल मा. जिल्हा

न्यायालयाने कायम ठेवला आहे. त्यामुळे वादि यांचा हक्क अद्यापही कायम आहे असे वादीचे म्हणणे आहे. मा. जिल्हा न्यायालयाच्या निर्णयावर मा. उच्चन्यायालयात दाद मागण्यात आलेली नाही.

सबब प्रतिवादींना वादीच्या सदर अधिकारास हरकत करण्याचा कोणताही अधिकार नाही. मात्र प्रतिवादि वारंवार तसे कृत्य करित असतातच करीत आहेत. त्यामुळे वादीचे अधिकारास हरकत/बाधा पोहचणारी असुन त्यामुळे वादीच्या पुर्वापार अधिकारावर संकट आले आहे.

प्रतिवादीच्या कृत्यामुळे वादींना त्यांचा हक्क बजावयाला न मिळाल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीमध्ये दि.०३/०३/१८ रोजी वादि महाशिवरात्रीच्या निमित्ताने पुजा करणेकरिता, देवकार्यासाठी गेले असता, वादींना देवी भद्रकाली ची पुजा करणे पासुन प्रतिवादींनी मज्जाव केला. वादींना कोणत्याही प्रकारचे मतमान, देवकार्य करु नये अगर उपभोगु नये असे प्रतिवादी म्हणाले. तसे केल्यास वाईट परिणाम होतील अशी धमकी देखील दिली आहे. तसेच दि २५.०३.२०१८ रोजी वादि हे देवी भद्रकाली-भराडी पंचायतनच्या होळीच्या कार्यक्र--माचे आयोजन करीत असताना वादींना प्रतिवादींनी होळीचा कार्यक्रम करु देणार नाही असे धमकावले आहे. होळीचा सण हा एक प्रमुख सण असतो व सदर पंचायतनातर्फे गाव होळी घातली जाते व त्याठिकाणी वादि घराण्याला मान असतो. सबब त्या सणाच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सर्व मानपान करण्याचा, देवकार्य करण्याच्या वक्षयत्रनानकरी म्हणून सर्व गोष्टी करण्याचा अधिकार वादी घराण्याला असतो. सबब त्या अर्थी र.दि.अपील २७३६/६२ मधील निर्णय अद्यापही

अस्तित्वात आहे त्याआधी वादी घराच्या अधिकार अबाधित असुन प्रतिवादी १ ते १६ यांना जिल्हा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कोणत्याही कार्यक्रमात भाग घेता येणार नाही अथवा अन्य कोणाही मार्फत त्यांना श्री देवी अद्भकाली- भराडी पंचायतनातील वादींना होळीच्या प्रसंगीचे देव कार्य करणेस, मतमान, उत्पन्न वगैरे उपभोगण्यास, वादींना हरकत अडथळा करु नये अशी प्रतिवादीं विरुध्द तुर्तातुर्त ताकिद मागितली आहे.

४. या अर्जाची प्रतिवादी क्र. १, २, ३, ४, ५, ८, ९, १६, १०, ११, ७ व १३ यांना नोटिस बजावणी झाली आहे. प्रतिवादी क्र. ६, १३, १४, १५ यांना नोटिस बजावणी झालेली नाही. त्यांच्या पैकी प्रतिवादी क्र. १, ५, ८ व १२ यांनी आपले म्हणणे मांडलेले आहे. सदर म्हणणे नि २७ वर असुन सदर प्रतिवादींनी वादीच्या अर्जाचे खंडन केले आहे. त्यांच्या मते वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. रे.दि.अ. ०१/१९६९ अगर रे.दि.मु.प्रथ १९६८ च्या कामी प्रस्तुत कामातील कोणतेही प्रतिवादी पक्षकार नव्हते. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींविरुध्द कोणताही मनाई आदेश अस्तित्वात नाही. व सदर प्रकरणांमधील आदेश प्रतिवादींवर बंधनकारक नाही असे त्यांचे मत आहे याच दाव्यात यापुर्वी देखील अशाच स्वरुपाचा अर्ज दाखल करणेत आला असुन तो सध्या प्रलंबीत आहे त्यामुळे तशाच प्रकारचा दुसरा अर्ज वादी यांना पुन्हा करता येणार नाही. वादीची प्रस्तुत अर्जान्वये असणारी मागणी व दाव्याची अंतिम मागणी एकच स्वरुपाची असल्यामुळे पुरावा घेतल्या शिवाय तशी मागणी करता येणार नाही असे प्रतिवादींचे म्हणणे आहे. वादींना प्रथमदर्शनी केस नसुन, त्यांचा अर्ज मंजूर झाल्यास

प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होईल असे त्यांचे म्हणणे आहे. त्याच प्रमाणे प्रतिवादी यांना त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. पोलीस अधिकाऱ्यांनीही यापुर्वी वादींना समज दिली असून प्रतिवादीच्या न्यायहक्काला बाधा आणु नये असे निर्देश करुन दोन्ही पदाधिकाऱ्यांनी एकत्रित सर्व सण साजरे करण्याचे समज दिली होती. सबब वादीने त्याचा अर्ज घाई गडबडीने दाखल केला आहे, त्यास delay व latches ची बाधा आहे. वादीने वस्तुस्थिति लपवून अर्ज केला आहे आणि देवस्थानाचे व्यवस्थापन पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या निर्देशाप्रमाणे होते त्यामुळे पुर्वीच्या अर्जावरील दिलेल्या म्हणण्याचा देखील विचार करावा असे प्रतिवादीचे मत आहे.

५. उपरोक्त परिस्थितीचा विचार करता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित राहतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी सकृतदर्शनी बाजू दर्शवित आहे का? | होय. |
| २. | न्यायाचा समतोल मनाई देण्याच्या बाजूने झुकतो का? | होय. |
| ३. | मागणीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे का? | होय. |
| ४. | काय आदेश. | अर्ज मंजूर |

## कारणमिमांसा

६. मुद्दा क्र. १ते ३

दोन्ही बाजुकडील विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे व त्याकामी दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दाव्यात सर्व प्रतिवादी हजर झाले आहेत मात्र दाव्याचे कामी कैफीयत सादर करणेत आलेली नाही. थोडक्यात सांगायचे तर वादीहे प्रस्तुत दाव्या व्दारे त्यांचा मानपान करण्याच्या अधिकारांची हक्कस्थापना होऊन मिळण्यासाठी व त्या अनुषंगाने मनाई मिळण्यास दावा दाखल केला आहे. वादी याने नि ७ व नि ८ येथे या न्यायालयाचा रे.दि.मु. ५९/१९६० व रे.दि.अ. २१/१९६३ च्या निकालांची नक्कल सादर केली आहे. वादी सदर निर्णयावर विसंबून आहेत आहे. त्यांच्या मते सदर दाव्या मध्ये वादी घराण्याला अग्रकाली पैंचायतन च्या मंदिरात मानपान व त्या अनुषंगीक सर्व अधिकार आहेत. मात्र प्रतिवादींच्या मते त्या कामी ते पक्षकार नसल्यामुळे तो निर्णय त्यांच्यावर बंधनकारक नाही. अशा परिस्थिती मध्ये सदर दाव्याच्या निकालाचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे आदेश करणेत आला होता.

## Order

The suit stands decreed. It is hereby declared that plaintiffs no. 1to3 have the exclusive right of performing all the duties at the ceremonies at suit temple, to enjoy the matman and to collect

[signature]

the afferings and after deducting the expenses to distribute the net proceeds amongst the three wakals of the Kulkar sect. Defendants are therefore permanently restrained from interfering with the enjoyment of Plaintiffs of such rights. Plaintiffs no. 1 and 3 do recover Rs. 50/- as damages from all the defendants except Defendant no. 1. All the defendants except Defendant no. 21 shall pay the costs of this suit to the Plaintiffs and bear their own. Defendant 21 to bear his own costs.

सदरच्या आदेश हा मा. जिल्हा न्यायालय यांनी देखील कायम केला होता. सबब सदर दोन्ही आदेशांचे अवलोकन केले असता वादींच्या म्हणजे क्र. १ ते ३ यांच्या वडीलांनी सदर दावा दाखल केला होता असे दिसते. सबब त्यांच्या बडाव्याचा तो अधिकार आहे असे दिसते. कारण वादींच्या वडीलांनंतर तो अधिकार आता वादी भोगत आहेत. सबब प्रथमदर्शत: ही गोष्ट स्पष्ट होते की वादी यांच्या घरामध्ये तसा अधिकार होता.

७. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तिवाद केल्या प्रमाणे जरी प्रतिवादी हे त्या दाव्यात पक्षकार नसले तरी माझ्या समोर असणाऱ्या पुराव्या न्यायनिवाड्या वरून प्रथमदर्शत: हे स्पष्ट होते की वादींना तसा

अधिकार आहे. त्याचप्रमाणे तशा स्वरुपाचा अधिकार हे प्रतिवादी नाकारत आहेत. पुर्वीच्या दाव्यातील प्रतिवादींनी देखील तो अधिकार नाकारला होता मात्र तो दावा वादींच्या वडीलांच्या बाजुने झाला. सबब या दाव्यात देखील तश्याच स्वरुपाचा अधिकार असल्याने व प्रतिवादी हे त्यांच्या कृत्यामुळे व म्हणण्यामध्ये घेतलेल्या हरकतींवरुन ही गोष्ट स्पष्ट होते की ते वादींचा हक्क नाकारत आहेत. सबब वादीच्या हक्कांचे रक्षण करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे वादींचा सदर मंदिरात पुजा अर्चा करणेचा अधिकार हा वैयक्तीक स्वरुपाचा अधिकार आहे. त्याला सार्वजनिक न्यास कायद्यातील तरतुदींची कोणतीही बाधा येत नाही. याचे कारण म्हणजे सार्वजनिक न्यासाच्या कामकाजाशी वादीच्या अधिकारांचा कोणताही संबंध नाही. त्या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत.

८. अशा परिस्थितीत मध्ये न्यायाचा समतोल हा मनाई देण्याच्या बाजूने झुकला आहे. वादीच्या मागणीप्रमाणे मनाई न दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे. ~~सम~~ उलटपक्षी प्रतिवादींनी वादीच्या अधिकारांचे खंडन करणेकरिता अशी कोणतीही सबळ गोष्ट समोर आणलेली नाही. सबब वादी हे मनाई मिळण्यास पात्र आहेत असे दिसते. याकामी जे प्रतिवादी हजर झाले आहेत त्यांच्या विरुद्ध मनाई देणे मला उचित वाटते कारण बाकी प्रतिवादी हे या अर्जाच्या सुनावणीला हजर राहिले नाहीत. सबब मी

खालील आदेश पारित करतो.

१. वादींचा अर्ज मंजुर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५, ७ ते १२, व १६ यांनी अथवा त्यांच्या वतीने अन्य कुणीही श्री देवी भद्रकाली- मराठी पंचायतनातील होळी प्रसंगीची देवकार्य करणेस, मतप्रान (मानपान), उत्पन्न, वगैरे उपभोगण्यास, वादींना हरकत अडथळा करू नये अशी मुतालुल ताकिद देणेत येते.

वेंगुर्ला

दि. २५/०२/२०१८

(signature)

दिवाणी न्यायाधिश क. स्तर वेंगुर्ला

पद्माकर कुडाळ.

Seen,
(signature)
Adv for Defendant